ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

“ अर्थ एव प्रधानः ” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 5434. Licence No. 53.

वर्ष २१ | पुणें, बुधवार तारीख १३ जून, १९५६ | अंक २४

## विविध माहिती

**कॉफीच्या उत्पादनाचा अभ्यास**—इंडिअन कॉफी बोर्डानें आपले दोन वनस्पतिशास्त्रज्ञ परदेशांतील कॉफीच्या उत्पादनाचा अभ्यास करण्यासाठी पाठविण्याचें ठरविलें आहे. हे तज्ज्ञ कीनिआ, युगांडा आणि टँगानिका ह्या देशांतील कॉफीच्या लागवडीचा व तत्संबंधी करण्यांत येणाऱ्या प्रयोगांचा अभ्यास करतील. म्हैसूर भागांतील एक-दोन मळेवालेहि त्यांच्याबरोबर जाणार आहेत.

**भारतीयांचा मॉस्कोंत विवाह**—रशिअन पुढारी मार्शल बुलगॅनिन आणि क्रुश्चेव्ह भारताच्या दौऱ्यावर असतांना त्यांच्या बरोबर दोन दुभाषी होते. श्री. विष्णु अहुजा आणि कु. अमिना अहमद हीं त्यांचीं नांवें. ह्या दोघांचा विवाह मॉस्को येथील भारतीय वकिलातींत साजरा करण्यांत आला. वर हिंदु असून वधू मुसलमान आहे. विवाहप्रसंगीं रशिअन पुढाऱ्यांतर्फे हारतुरे पाठविण्यांत आले होते.

**कम्युनिस्ट वाङ्मयावरील बंदी**—सीलोनचे माजी मुख्य प्रधान श्री. कोटलावाला ह्यांनीं कम्युनिस्ट मतप्रणालीचें वाङ्मय सीलोनमध्यें आयात करण्यास बंदी केली होती. नवे पंतप्रधान श्री. बंद्रनायके ह्यांनीं ही बंदी उठविली आहे. सीलोनच्या पार्लमेंटमधील एका कम्युनिस्ट सभासदाच्या विनंतीवरून बंदी उठविण्यांत आली आहे.

**खाजगी कॉलेजांना कर्जें**—मध्यप्रदेश सरकारनें खाजगीरीत्या चालविण्यांत येणाऱ्या कॉलेजांना नेहमींच्या आर्थिक मदतीखेरीज आणखी कर्जें देण्याचा निर्णय प्रथमच घेतला आहे. ह्या सर्वांचा उपयोग इमारती व वसतिगृहें बांधण्यासाठी करावयाचा आहे. ह्या निर्णयामुळें बिनसरकारी कॉलेजांची चांगली सोय झाली आहे.

**ब्रह्मदेशाकडून सिमेंटची खरेदी**—भारतीय सरकारनें ब्रह्मदेशाकडून ५०,००० टन सिमेंट विकत घेण्याची तयारी दाखविली आहे. हें सिमेंट ब्रह्मदेशाच्या सरकारनें रशिआ, झेकोस्लोव्हाकिआ व पूर्व जर्मनी ह्या देशांकडून विकत घेतलेलें आहे. सिमेंटची किंमत दर टनामागें १७५ शिलिंग ठरलेली असून तें भारतीय बंदरांत पोंचतें करावयाचें आहे.

**मलायामध्यें डॉक्टर्सची जरूरी**—मलायामध्यें डॉक्टर्सची इतकी वाण आहे कीं फेडरेशनचे दोन अधिकारी भारतांतून २५ डॉक्टर्सची भरती करण्यासाठी लवकरच भारतांत येणार आहेत. ह्यापूर्वी ३० हिंदी डॉक्टर्स तीन वर्षांच्या करारावर तिकडे गेले आहेत. फेडरेशनमधील इस्पितळांत काम करण्यासाठी १०० डॉक्टर्सची अतिशय जरूरी आहे.

**सीलोनमध्यें काथ्याचा धंदा**—सीलोनमध्यें काथ्याचा धंदा स्थापन करण्यासाठी भारतीय सरकारनें त्या धंद्यांतील एक तज्ज्ञ सीलोनला पाठवावा, अशी विनंति सीलोनच्या सरकारनें केली आहे. सीलोनमधील नारळाचे मळेवाले नारळ पक्व झाल्यावर तो आपोआप पडून देण्याची पद्धत अवलंबीत आहेत. ह्या पद्धतीमुळें नारळाचा काथ्या इतर वस्तू बनविण्यासारखा रहात नाहीं.

**वृत्तपत्रांना लागणारा कागद**—दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत वृत्तपत्रांना लागणारा १,००,००० टन कागद निर्माण करण्याचें उद्दिष्ट नियोजन-समितीनें ठरविलें आहे, अशी माहिती राज्यसभेंत सांगण्यांत आली. त्यांपैकीं ३०,००० टन कागद मध्यप्रदेशांत नुकत्याच चालू झालेल्या नेपा गिरणींत तयार होईल. उरलेलें उत्पादन करण्यासाठी आणखी दोन-तीन कारखाने काढण्यांत येण्याचा संभव आहे.

**भारतासंबंधीं रशिअन माहितीपट**—रशिआच्या मध्यवर्ती सिनेमा-संघटनेतर्फे भारतीय जीवनाविषयीं एक चित्रपट तयार करण्यांत येत आहे. रशिअन सिने-तंत्रज्ञांचे पुढारी ह्यासंबंधीं म्हणाले कीं रशिअन जनतेला भारताविषयीं फार जिज्ञासा आहे. अनुबोधपट ९,००० फूट लांबीचा होईल.

**सुरत म्युनिसिपालिटीचें कर्ज**—सुरत म्युनिसिपालिटीनें पाण्याची व ड्रेनेजची सोय करण्यासाठी ३० लाख रुपयांची योजना आखली आहे. ही रकम खुल्या बाजारांत कर्जाच्या रूपानें उभारण्याची परवानगी मुंबई सरकारनें दिली आहे. कर्जाचा व्याजाचा दर ४॥ टक्के असून तें १२ वर्षांत परत करण्यांत यावयाचें आहे.

**भावनगरजवळ बोटींचा कारखाना**—भावनगरजवळील एका खाडींत छोट्या बोटी बांधण्याचा कारखाना काढण्याचा विचार एका खाजगी कंपनीतर्फे चालू आहे. कारखाना काढण्याचें निश्चित झालें तर त्यासाठी रोज ३०,००० गॅलन गोडें पाणी मिळणें आवश्यक आहे. भावनगरच्या नगरपालिकेनें ही सवलत देण्याचें कबूल केलें आहे.

**रशिअन भाषेंत टिळकांचें चरित्र**—लोकमान्य टिळकांच्या जन्मशताब्दिनिमित्त त्यांचें रशिअन भाषेंतील चरित्र ता. १ ऑगस्ट ह्या दिवशीं रशिआंत प्रकाशित करण्यांत येणार आहे. हें चरित्र तयार करण्याचें काम रशिआच्या ॲकॅडेमी ऑफ सायन्सच्या प्राच्य विद्या-संशोधन खात्यानें केलें आहे. टिळक व लेनिन हे समकालीन होते. लेनिनच्या लिखाणांत साम्राज्यविरोधी म्हणून टिळकांचा उल्लेख आलेला आहे.

## भारतांतील पीकविषयक आंकडेवारी

भारतांत १९५४–५५ मध्यें एकूण २०,८८,२३,००० एकर विभागांत अन्नधान्यांची लागवड झाली. पांच वर्षांपूर्वीचा म्हणजे १९५०–५१ चा हाच आंकडा १९,३३,१४,००० एकर असा होता. १९५४–५५ मधील लागवडीखालील एकूण क्षेत्रापैकी ३,६८,४२,००० एकरांत गव्हाची लागवड करण्यांत आली होती. १९५०–५१ या पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या पहिल्या वर्षांत गव्हाची लागवड २,४०,८२,००० एकरांत झाली होती. लागवडीखालील क्षेत्रांत होणाऱ्या वाढीप्रमाणेंच उत्पादनांतहि वाढ झाली. १९५०–५१ मधील ६३,६०,००० टनांवरून १९५४–५५ मध्यें उत्पादन ८५,३९,००० टनांवर गेलें. त्याचप्रमाणें देशांतील एकूण पिकांच्या उत्पन्नांतहि वाढ झाली. १९५०–५१ मधील ४,१७,४४,००० टनांवरून १९५४–५५ मध्यें तें ५,५३,२७,००० टनांवर गेलें. तसेंच १९५०–५१ मध्यें ५९२ रत्तल हें गव्हाचें दर एकरीं असलेलें उत्पादन वाढून १९५४–५५ मध्यें दर एकरीं ७१३ रत्तलापर्यंत गेलें.

पहिल्या पंचवार्षिक योजनेंत १९५५–५६ साठी ठरविलेल्या उत्पादनाच्या लक्ष्यांचा विचार करतां अन्नधान्यें, डाळी, गळित धान्यें आणि कापूस यांनीं हीं लक्ष्यें १९५४–५५ मध्यें अन्नधान्याचें एकूण उत्पादन ५५·३ दशलक्ष टन म्हणजे १९५५–५६ साठी ठरविलेल्या लक्षापेक्षा २·८ दशलक्ष टनांनीं जास्त झालें. व्यापारी पिकांचा विचार करतां तागाशिवाय सर्व पिकांचें बाबतींत १९५४–५५ मध्यें त्यामागील वर्षापेक्षा उल्लेखनीय वाढ दिसून आली. १९५३-५४ मध्यें गळितधान्यांचें उत्पादन ५·३ दशलक्ष टन होतें. १९५३–५४ मध्यें तें ५·९ दशलक्ष टनांवर गेलें. तसेंच कापसाच्या गासड्यांचें उत्पादन ३·९ दशलक्ष गांसड्यांवरून ४·३ दशलक्ष गांसड्यांवर व उसाचें (गुळाच्या स्वरूपांतील) उत्पादन ४·४ दशलक्ष टनांवरून ५·५ दशलक्ष टनांवर गेलें. गळित धान्यें आणि कापूस यांची १९५५–५६साठी ठरविलेलीं लक्ष्यें १९५४–५५ मध्यें अनुक्रमें ०·४ दशलक्ष टनानें आणि ०·१३ दशलक्ष गांसड्यांनीं जास्त झालीं.

## छोट्या कारखान्यासाठी हायर-पर्चेसनें यंत्रें

मर्यादित प्रमाणांत भांडवल असणाऱ्या छोट्या कारखान्यांना सोप्या हप्त्यांनीं यंत्रें व इतर साहित्यसामुग्री मिळावी म्हणून त्यांना हायर-पर्चेस तत्त्वावर यंत्रें पुरविण्याची एक नवी योजना नवी दिल्ली येथील नॅशनल स्मॉल इंडस्ट्रिज कॉर्पोरेशन लि. नें आखली आहे.

या योजनेचा फायदा घेऊं इच्छिणाऱ्या मुंबई राज्यांतील छोट्या कारखानदारांनीं ठराविक छापील फॉर्मवर स्टेट डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रीजच्या रिजनल असिस्टंट डायरेक्टोरेटकडे अर्ज करावे. अशा अर्जांची तपासणी करणें, त्यावर सही करणें व ते नॅशनल स्मॉल इंडस्ट्रीज कॉर्पोरेशनच्या प्रादेशिक एजंटाकडे पाठविणें या संबंधींचे अधिकार सदरहू अधिकाऱ्यांना देण्यांत आले आहेत. रिजनल असिस्टंट डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रीज यांच्या कचेऱ्या पुणें, नाशिक, अहमदाबाद, बडोदें व बेळगांव येथें आहेत. अर्जाचे फॉर्म डायरेक्टर, स्मॉल इंडस्ट्रीज सर्व्हिस इन्स्टिटयूट, ४०–४० ए, कॉवसजी पटेल स्ट्रीट, फोर्ट, मुंबई यांचेकडे मिळूं शकतील. अर्जाच्या फॉर्मसाठी चार आणे द्यावे लागतील.


यंत्राच्या किंमतीच्या ४० टक्के इतकी रकम अनामत ठेवल्यावर लायक अशा कारखान्यांना यंत्रें देण्यांत येतील. उरलेली रकम अनेक वर्षांत सोप्या हप्त्यांनीं वसूल करतां येईल.


राष्ट्रीय बचत योजना
व्याज ३ टक्के
मुख्य ऑफीस: सारस्वत बँक बिल्डींग मुंबई १
शाखा: फोर्ट, दादर, माहीम, बेळगाव, पुणे

अन्नाचें रहस्य


बेडेकर मसाले, लोणचीं, पापड
ह्या वस्तूंनीं आपल्या जेवणांत गोडी वाढते व समाधान वाटतें.
★ व्ही. पी. बेडेकर आणि सन्स लि. ★
दुकानें—गिरगांव, ठाकुरद्वार, दादर, कोट, परळ
— द. ना. हेजीब, ३० शुक्रवार पेठ, पुणें —

माधवाश्रम लि. भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय.
विवाहकार्याची संपूर्ण व्यवस्था. गिरगांव, मुंबई ४.

किर्लोस्कर
आपल्या उन्हाळी पिकांची जोपासना करण्यासाठी
★
सेंट्रिफ्युगल पंप
(टाइप:-एन्.बी.एस्.)
★

अधिक माहिती मागवा

# अर्थ

बुधवार, ता. १३ जून, १९५६





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## भिक्षेकऱ्यांविषयीं मनोरंजक व उद्बोधक अहवाल

हैदराबाद येथील इंडिअन इन्स्टिटयूट ऑफ इकॉनॉमिक्स ह्या संस्थेनें हैदराबाद व सिकंदराबाद ह्या दोन शहरांतील ६०० भिकाऱ्यांच्या जीवनाविषयीं एक अहवाल प्रसिद्ध केला आहे. भिकाऱ्यांच्या जीवनाविषयीं रूढ असलेल्या बऱ्याच समजुतींना अहवालांतील पृथःकरणात्मक माहितीमुळें धक्का बसेल ह्यांत शंका नाहीं. ह्या दृष्टीनें अहवाल नुसताच मनोरंजक नसून उद्बोधकहि आहे. ह्या भिकाऱ्यांचें सरासरी मासिक उत्पन्न २०६ रुपये आहे असें निरीक्षकांना आढळून आलें. ६०० भिकाऱ्यांपैकी १७१ जणांजवळ स्वतःच्या मालकीची मालमत्ता होती, १५२ भिकारी कर्जबाजारी होते, १४२ भिकाऱ्यांचीं स्वतःच्या मालकीचीं घरें अगर झोपड्या होत्या, व १३६ भिकारी भाड्याच्या जागेंत रहात होते. उरलेल्या भिकाऱ्यांना घरें नव्हतीं. ते बहुधा मोफत आश्रय-स्थानांत रहात होते. ८ भिकाऱ्यांनीं प्रश्न विचारणाऱ्यांना उत्तरें देण्यास नकार दिला. उरलेल्या ५९२ भिक्षेकऱ्यांपैकीं ५१ भिकारी चांगले निरोगी होते. ३७३ जण साधारणतः बऱ्या प्रकृतीचे होते. १६८ जण मात्र रोगी होते. ४० जण पूर्णपणें आंधळे होते व २३ अंशतः आंधळे होते. ५३ जण बहिरे होते. ८८ जणांना शारीरिक व्यंगें होतीं व २३ जण महारोगानें पछाडलेले होते.

भीक मागण्याच्या कारणांतहि बरीच विविधता दिसून आली. १७६ भिकारी वृद्धपणामुळें भीक मागत होते. १६४ जणांत कांहीं तरी शारीरिक व्यंग असल्यानें ते काम करण्यास असमर्थ होते. ६७ भिकारी अपुऱ्या उत्पन्नामुळें भीक मागण्यास प्रवृत्त झालेले आढळले. बेकारीमुळें ४४ जण हा धंदा करीत होते, तर मानसिक दृष्ट्या सदोष असल्यामुळें ११ जणांनीं भिक्षापात्र हातीं घेतलें होतें. ८५ भिकारी पिढीजाद हाच उद्योग करीत होते. काम करण्यास नाखुष असल्यामुळें ३१ जण भिक्षेकरी झालेले होते आणि एक मात्र संन्यासीच होता. भीक मिळविण्या-साठीं निरनिराळ्या युक्त्यांचा अवलंब केला जातो असें दिसलें. बहुतेक भिकारी म्हणजे ४१६ जण सरळच भिकेसाठीं तोंड वेंगाडत असत. पण इतर भिकारी साह्यक उपायांची कास धरीत असत. ३६ जण रस्त्यांतून गाणें म्हणून भीक गोळा करीत असत १२ जण प्रार्थनापर पद्यें म्हणून भीक मागत असत. १४ भिकारी कोठल्या तरी पवित्र तीर्थाचें नांव पुढें करून भिकेची मागणी करीत असत. २८ जण दात्यांची सहानुभूति जागी करण्यासाठीं आपलीं कच्चींबच्चीं पुढें करीत असत. ७९ भिकारी आपल्यामधील शारीरिक व्यंगाचें प्रदर्शन करीत असत. एक भिकारी स्वतःवर क्लेश व यातना ह्यांचे प्रयोग करीत असे. भविष्यकथन आणि यात्रा-प्रवास ह्या निमित्तानें चौघे जण उदर-निर्वाह करीत असत. बहुतेक भिकारी दात्यानें भीक नाकारल्यास कुरकूर अगर त्रागा करीत नसल्याचें आढळून आलें. दोघेजण वर्दळीवर येऊन शिव्याशाप देऊं लागत. १९ जण भीक नाकार-ल्यास थैमान घालीत असत आणि ३५ जण भीक दिल्याशिवाय जागचे हलतच नसत. सामाजिक व आर्थिक परिस्थितीवर प्रकाश टाकणाऱ्या ह्या अहवालावरून असें दिसून आलें कीं, कमी उत्पन्न मिळविणाऱ्या व्यापारधंद्यांतील लोकांपेक्षा हे भिकारीच अधिक सुस्थितींत होते! ह्यांचा अर्थ इतकाच होऊं शकेल कीं, भारता-मधील व्यापारधंदा अजून मिळकतीच्या दृष्टीनें निकृष्ट दर्जाचा आहे. एकंदरीनें भिकाऱ्यांकडून प्रश्नांना चांगली साद मिळाली. प्रश्न विचारण्याचें काम संपल्यावर प्रत्येक भिकाऱ्याला १ आणा रोख अगर अर्धा शेर ज्वारी देण्यांत आली. भिकाऱ्यांच्या मिळकत होण्याच्या वेळांतील कांहीं वेळ घेतल्याबद्दल मोबदला म्हणून ही व्यवस्था करण्यांत आली होती.

## श्री. चंद्रशेखर आगाशे ह्यांचा मृत्यु !

बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेटच्या योजनेचे जनक, प्रमुख उत्पादक व प्रारंभापासूनचे मॅनेजिंग एजंट श्री. चंद्रशेखर गोविंद आगाशे, हे गेल्या शनिवारीं मृत्यु पावल्याचें नमूद करण्यास अतिशय दुःख होतें. श्री. आगाशे ह्यांची ध्येयनिष्ठा व महाराष्ट्रप्रेम ह्यांच्या जोडीला सतत परिश्रम व उद्योग हीं असल्यामुळें त्यांनीं महाराष्ट्रांत साखरेचा मोठा कारखाना उभारून अशक्यप्राय गोष्ट कृतींत उतरवून दाखविली. अडचणींना न जुमानतां, सात्त्विक कर्तव्यनिष्ठेनें त्यांनीं बजावलेली कामगिरी सर्वांच्या आदरास पात्र झाली. त्यांच्या मृत्यूमुळें औद्योगिक महाराष्ट्र करारी कारखानदारास, समाजसेवकास व स्फूर्तिस्थानास मुकला आहे!

## पश्चिम आशियाई देशांत हिंदी विडी-तंबाखूचा प्रसार

पश्चिम आशियांतील व आफ्रिकेंतील कांहीं देशांत विडी व तंबाखूच्या वापरास चालना देण्याच्या विचारानुसार भारत सरकारनें भारतीय मध्यवर्ती तंबाखू समितीचे चिटणीस डॉ. पटेल व सागर येथील विड्यांचे व्यापारी श्री. मणिभाई यांस इजिप्त, गोल्ड कोस्ट, नायजिरिआ, सुदान, इत्यादि देशांचा दौरा करण्यास पाठविण्याचें ठरविलें आहे. हें शिष्टमंडळ ८ मे १९५६ रोजीं भारतांतून निघालें व तें सुमारें ४० दिवस दौरा करील. भारतीय तंबाखू व विड्यांस त्या देशांत बाजारपेठ मिळण्याची शक्याशक्यता हें मंडळ पाहील.

## घर बांधणीसाठीं दिलेलीं कर्जें

व्यक्तींना आणि संस्थांना घरें बांधण्यासाठीं दिलेल्या कर्जाची परतफेड सामान्यपणें वार्षिक हप्त्यांनीं करण्यांत येते. परंतु या बाबतींत कर्जदाराची तशी इच्छा असल्यास त्याला ही परतफेड सहामाही हप्त्यांनीं करतां येईल असा आदेश मुंबई सरकारनें दिला आहे. त्याप्रमाणें हीं कर्जें देण्याबाबतच्या नियमांत आवश्यक ती दुरुस्ती करण्यांत आली आहे.

## दुसरी पंचवार्षिक योजना

### सरकारी क्षेत्रासाठी पैशाची व्यवस्था

या योजनेंतील संकल्पित अर्थव्यवस्था पुढील तक्त्यांत देण्यांत आली आहे:—

(आंकडे कोटी रुपयांचे)

| | |
|---|---|
| १. चालू महसुलांतील शिल्लक | ८०० |
| (अ) करांच्या चालू (१९५५–५६) दरानें | ३५० |
| (ब) नवे कर बसवून | ४५० |
| २. जनतेकडून पैसा उधार घेऊन | १,२०० |
| (अ) कर्ज उभारून | ७०० |
| (ब) अल्पबचतीद्वारां | ५०० |
| ३. अर्थसंकल्पीय इतर साधनांद्वारें | ४०० |
| (अ) विकास कार्यक्रमासाठी रेल्वेकडून मिळणारी रक्कम | १५० |
| (ब) प्रॉ. फंडांतील व इतर ठेवींतील रकमा | २५० |
| ४. परराष्ट्रीय मदत | ८०० |
| ५. तुटीचा अर्थभरणा (डेफिसिट फायनान्सिंग) | १,२०० |
| ६. इतर मार्गांनीं अथाप भरून काढावयाची रक्कम | ४०० |
| एकूण | ४,८०० |

कर, कर्जें व इतर मार्गांचा अवलंब करून मध्यवर्ती व राज्य सरकारें २,४०० कोटी रु. उभारूं शकतील. आणखी १,२०० कोटी रु. तुटीच्या अर्थभरण्यानें उभारतां येतील असें सुचविण्यांत आलें आहे. त्यांत ८०० कोटी रु. च्या परकीय मदतीची भर घालतां सरकारी क्षेत्रांतील कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी एकूण ४,४०० कोटी रु. उभारले जातील म्हणजेच ४०० कोटी रु. ची तूट भरून काढणें आहे. ही तूट देशांतच जादा साधनें निर्माण करून, कर आकारून व सरकारी योजनांतील फायद्यांतून भरून काढावी लागेल.

१९५५–५६ मधील कर आकाणीनुसार मध्यवर्ति व राज्य सरकारांस ५ वर्षांच्या कालावधींत अंदाजें ५,००० कोटी रु. उभारतां यावेत. यांपैकी विकासेतर कार्यक्रमांसाठी सुमारें ४,६५० कोटी रु. खर्च होतील. म्हणजे योजनेवरील खर्चासाठी यांतील ३५० कोटी रु. उरतात. विकासेतर कार्यक्रमांवरील खर्चांत वाढ झाली अगर दारूबंदीसारख्या समाजकल्याणाच्या उपाययोजनांमुळें उत्पन्नांत घट आली तर त्याचवेळीं उत्पन्नाच्या साधनांतहि वाढ करण्याचे प्रयत्न करावे लागतील. जादा करांद्वारां जास्तींत जास्त १५० कोटी रु. मिळविण्याचा प्रयत्न करतां येण्यालायक आहे. आंकडा ठरवितांना करचौकशी-समितीच्या शिफारशी विचारांत घेण्यांत आल्या असून योजनेस सुरवात झाल्यावर शक्य तितक्या लवकर या शिफारशींची अंमलबजावणी करण्यांत येईल असें गृहीत धरण्यांत आलें आहे. यासाठी राज्य सरकारांनीं २२५ कोटी रु. व मध्यवर्ति सरकारनेंहि तेवढीच रक्कम उभारावी अशी अपेक्षा आहे.

### सरकारी गुंतवणूक व बचत

सरकारी क्षेत्रांतील एकूण ४,८०० कोटी रु. खर्चापैकीं १,००० कोटी रु. खर्च शिक्षण, आरोग्य, शास्त्रीय संशोधन, राष्ट्रीय विस्तार योजना, यांसारख्या विकास कार्यक्रमांची व्याप्ति वाढविण्यावर खर्च होतील. म्हणजे, सरकारी क्षेत्रांत गुंतवणुकी-साठी ३,८०० कोटी रु. राहतात.

योजनेंतील संकल्पित अशा १,२०० कोटी रु. च्या तुटीच्या भरण्यापैकी २०० कोटी रु. स्टर्लिंग गंगाजळींतून आपणांस घ्यावे लागतील. बाकीची १,००० कोटीची तूट म्हणजे सरकार-च्या अर्थसंकल्पीय योजनेनुसार चलनांत पडणारी निव्वळ भर होय. या पांच वर्षांच्या कालांत चलन पुरवठ्याचें प्रमाण ६६ टक्क्यांनीं वाढेल, तर राष्ट्रीय उत्पन्न २५ टक्क्यांनीं वाढणार आहे. अर्थव्यवस्थेंत अर्थोत्पादक मत्तेचीहि भर पडेल हें लक्षांत घेतां चलन पुरवठ्यांत होणारी वाढ मर्यादेबाहेर आहे असें म्हणता येणार नाहीं.

### राज्य सरकारांचीं उत्पन्नाचीं साधनें

या योजनेंत 'अ' व 'ब' विभागीय राज्यांच्या योजना पार पाडण्यासाठी त्यांचीं उत्पन्नाचीं साधनें पुढील तक्त्यांत दिल्या-प्रमाणें अपेक्षित आहेत:—

(कोटी रुपये)

१९५६–६१

| | 'अ' विभागीय राज्य | 'ब' विभागीय राज्यें | एकूण |
|---|---|---|---|
| १. योजनेची व्याप्ति | १५६७.२ | ५३५.४ | २१०२.६ |
| २. महसुली उत्पन्न | ३१२.३ | २४.४ | ३३६.७ |
| ३. भांडवली उत्पन्न | ३७७.३ | १०८.८ | ४८६.१ |
| ४. एकूण | ६८९.६ | १३३.२ | ८२२.८ |
| ५. साधनांची तूट | ८७७.६ | ४०२.२ | १२७९.८ |

यावरून, सर्व राज्यांचीं उत्पन्नाचीं साधनें जमेस धरूनहि एकूण गरजेच्या तीं ६० टक्के कमी पडत असल्याचें दिसून येईल.

राज्य सरकारांनीं जादा कर बसवून उभारावयाच्या २२५ कोटी रु. रकमेकरितां सध्यां ठरविण्यांत आलेली करवाढ योजना अशी :—

| | कोटी रुपये |
|---|---|
| जमीन महसूल | ३७.० |
| शेतकीविषयक प्राप्तिकर | १२.० |
| सुधार कर | १६.० |
| पाणी पट्टी | ११.० |
| विक्री कर | ११२.० |
| वीज पट्टी | ६.० |
| मोटर कर, स्टॅम्प ड्यूटीज, कोर्ट फी इ. | १४.० |
| इतर (मुख्यतः स्थानिक मालमत्तेवरील कर) | १७.० |
| एकूण | २२५.० |

तमाम दंतरोगांवर
★ माकडछाप म्हणजेच काळी दंत पावडर ★

### भारताला अधिक मदत देण्याची सूचना

अमेरिकेच्या सीनेटच्या परराष्ट्रीय-संबंध-कमिटीचे अध्यक्ष सीनेटर मॅन्सफील्ड ह्यांनीं भारत व चीन ह्यांच्या आर्थिक विकासाचा अभ्यास करून एक अहवाल प्रसिद्ध केला आहे. अहवालांत त्यांनीं अशी सूचना केली आहे कीं भारताला देण्यांत येणाऱ्या आर्थिक मदतींत वाढ करावी. सीनेटर मॅन्सफील्ड हे डेमोक्रॅटिक पक्षाचे आहेत. ते म्हणतात कीं आशिआ खंडांत कम्युनिस्ट चीन जर प्रभुत्व गाजवूं लागला तर अमेरिकेला असणारा धोका अनेक पटींनें वाढल्याशिवाय राहणार नाहीं. भारत व कम्युनिस्ट चीन ह्यांच्या आर्थिक विकासाचा निःपक्षपाती दृष्टीनें तौलनिक अभ्यास केला तर भारताच्या प्रगतीच्या वेगाबद्दल चिंता वाटल्याखेरीज राहणार नाहीं. कम्युनिस्ट राष्ट्रगट सोडून जगाचा जो स्वतंत्र भाग आहे त्याच्या दृष्टीनें विचार करतां भारताची प्रगति पुरेशा गतीनें होत आहे असें वाटत नाहीं. अमेरिकन कॉंग्रेसनें, सरकारनें आणि लोकांनीं भारताला देण्यांत येणारी आर्थिक मदत ज्या हेतूनें ती देण्यांत येत आहे तो साध्य होण्यास पुरेशी आहे कीं नाहीं ह्या गोष्टीचा पुन्हा विचार करणें आवश्यक आहे. अमेरिकन कॉंग्रेस सध्यां परदेशांना द्यावयाच्या आर्थिक मदतीचा विचार करीत आहे. प्रेसिडेंट आयसेनहोअर ह्यांनीं ह्या मदतीच्या कार्यक्रमासाठी ४९० कोटी डॉलर्सची मागणी कॉंग्रेसकडे केलेली आहे. परंतु ह्या रकमेंत १००-कोटी डॉलर्सची कपात करण्यांत यावी अशी शिफारस अमेरिकेच्या हाऊस ऑफ रिप्रेझेंटेटिव्हच्या परराष्ट्रीय संबंध कमिटीनें केलेली आहे. भारतानें परराष्ट्रीय धोरणांत तटस्थपणाची भूमिका स्वीकारल्यामुळें अमेरिकन कॉंग्रेसमधील कांहीं सभासदहि भारतावर टीका करीत आहेत.

### खाणी चालविण्यासाठी कॉर्पोरेशन

सार्वजनिक मालकीच्या कोळशाच्या खाणी चालविण्यासाठी भारतीय सरकार लवकरच एक कॉर्पोरेशन स्थापन करणार असल्याची वार्ता आहे. सध्यां सरकारच्या मालकीच्या १० कोळशाच्या खाणी असून त्यांच्या मालमत्तेची किंमत सुमारें ८०० लाख रुपये होईल. नवीन स्थापन होणाऱ्या कॉर्पोरेशनचें प्रारंभींचें भांडवल इतकेंच राहणार आहे. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत सार्वजनिक क्षेत्रांत कोळशाचें उत्पादन १·२ कोटी टन करण्याचें ठरविण्यांत आलें आहे. हें उद्दिष्ट गाठण्यासाठी कॉर्पोरेशनला आणखी ६० कोटी रु. भांडवलाची आवश्यकता आहे ही रक्कम कॉर्पोरेशनला हप्त्यानें देण्यांत येणार आहे. कॉर्पोरेशनची मुख्य कचेरी रांचीला राहील व रजिस्टर्ड कचेरी दिल्लीला राहील अशी अपेक्षा आहे. सरकारनें कोल कमिशनरची कचेरी कलकत्त्याहून रांचीला हलविण्याचा निर्णयहि घेतला आहे. कॉर्पोरेशनच्या डायरेक्टर बोर्डावर सरकारचे प्रतिनिधी आणि कोळशाच्या खाणीसंबंधीं अनुभव असलेले खाजगी उद्योगधंद्यांतील लोक असतील. कोर्बा येथील कोळशाच्या खाणींचा विकास करण्याचें काम कॉर्पोरेशन प्रथम हातीं घेईल. ह्या खाणींतून ४० लाख टन कोळसा काढण्याचें ठरविण्यांत आलें आहे. उत्पादन इतकें वाढविण्यासाठी २० ते २५ कोटी रुपये भांडवल घालावें लागेल असा अंदाज आहे. भारतीय सरकारच्या उत्पादनखात्याचें असें मत आहे कीं कार्यक्रमाच्या कालांत कोळशाचें एकूण उत्पादन ६ कोटी टनांऐवजीं ६·२ कोटी टन करावें लागेल. सिमेंटच्या उत्पादनाचें उद्दिष्ट १·३ कोटी टनांवरून १·६ कोटी टनांवर नेण्याचें ठरलें असल्यामुळें कोळशाच्या उत्पादनांतहि वाढ करावी लागेल असा अंदाज करण्यांत आला आहे. तथापि ह्या संबंधींच्या निर्णयाची फेरतपासणी १९५७ च्या मार्चअखेर करण्यांत येईल.

### अणुशक्ति युरोपला पुरणार नाहीं

युरोपिअन इकॉनॉमिक कॉर्पोरेशन ह्या संघटनेनें अणुशक्तीच्या संभाव्य उत्पादनाचा अभ्यास करण्यासाठी एक कमिशन स्थापन केलें आहे. कमिशनचे अध्यक्ष मि. हेरोल्ड हार्टले ह्यांनीं ह्यासंबंधीचा अहवाल तयार करून प्रसिद्ध केला आहे. त्यावरून असें दिसतें कीं, आणखी वीस वर्षांनंतरसुद्धां युरोपला जितकी औद्योगिक शक्ति लागेल तींपैकी जास्तींतजास्त ८ टक्केच शक्ति अणुज्वलनाच्या साह्यानें पुरवितां येईल. ह्याविषयीं वृत्तपत्रप्रतिनिधींशीं बोलतांना मि. हार्टले म्हणाले कीं अणुशक्तीच्या उत्पादनाविषयीं पुष्कळ लोकांच्या कल्पना अतिरंजित असतात. युरोपला लागणारें औद्योगिक इंधन लवकरच संपूर्णपणें अणुज्वलनानें निर्माण करतां येईल अशी जी समजूत आहे ती ह्याच नमुन्याची आहे. युरोपमधील उत्पादन वाढत जाणार आहे. त्याचप्रमाणें कारखान्यांतून स्वयंचलित उत्पादनपद्धतीहि वापरण्यांत येणार आहे. त्यामुळें युरोपची औद्योगिक शक्तीची गरजहि वाढत जाणार आहे. १९५५ सालीं पश्चिम युरोपच्या कारखान्यांना ७३ कोटी टन कोळशाच्या साह्यानें उत्पन्न करतां येईल इतकी औद्योगिक शक्ति लागली. १९७५ च्या सुमारास १२० कोटी टन कोळशाच्या जळणाची शक्ति युरोपला लागेल. पश्चिम युरोपमधील औद्योगिक शक्तीचा पुरवठा व गरज ह्यांमध्यें पडणारी तफावत बाहेरून कोळसा व तेल आयात करून भरून काढावी लागेल. सध्यांच्या किंमतीनें हिशोब केला तर ह्यासाठी ५०० कोटी डॉलर्स द्यावे लागतील. युरोपच्या परदेशीय देण्याघेण्याच्या व्यवहारावर जळणाच्या किंमतीचा महत्त्वाचा परिणाम होईल. अणुशक्तीचा पुरवठा भरपूर प्रमाणांत लवकरच होऊं लागेल अशी कल्पना खूपच पसरलेली आहे. त्याचा एक परिणाम असा होत आहे कीं युरोपांतील कोळशाच्या खाणींचा विस्तार करण्याचे प्रयत्न नीट होत नाहींत.

### वैमानिक वहातुक

जुलै ते डिसेंबर, १९५५ ह्या मुदतींत एअर-इंडिया इंटरनॅशनलच्या विमानांतून २८,०९१ उतारूंनीं प्रवास केला. ह्याच मुदतींत इंडियन एअरलाइन्स कॉर्पोरेशननें २,३४,९४२ उतारूंची वहातुक केली. १९५५ मध्यें विमानांतून प्रवास करणारांच्या संख्येंत वाढ झाली आहे.


## DECCAN INSTITUTE OF COMMERCE

**594, Budhawar Peth, Poona 2.**

Opens for the 1956-57 session on Thursday the 21st June 1956. Students coached up for G. C. D., L. C. C., D. Com., C. A. (Preliminary), G. D. C. & A., C. A. I. I. B., A. C. M. A., Shorthand, Typewriting. Morning and Evening Classes.

Admission to respective Diploma Courses open to Matriculates, Under-graduates and Graduates.

Prospectus free on application to the Secretary.

# दि बेळगांव बँक लि.,

## केंद्रीय गृहखात्यांतील मंत्रि, श्री. बळवंतराव दातार, ह्यांची भेट

दि बेळगांव बँक लि. ला बुधवार, दि. ६ रोजीं संध्याकाळीं केंद्रीय गृहखात्यांतील मंत्री व बेळगांवचे नागरिक श्री. बळवंतराव दातार ह्यांनीं अनौपचारिक भेट दिली. त्या प्रसंगीं बँकेचे चेअरमन श्री. गोविंदराव सराफ, ह्यांनीं त्यांचें स्वागत करून बँकेच्या सुरवातीपासूनच्या प्रगतीचा अहवाल निवेदन केला आणि बँकांच्या प्रगतीच्या दृष्टीनें खालील सवलतींची आवश्यकता स्पष्ट करून सांगितली :—

### श्री. सराफ ह्यांचें निवेदन

(१) नॅशनल सेव्हिंग्ज सर्टिफिकेटस, इ. च्या तारणावर बँकांकडून कर्ज घेण्याची मुभा असावी. यामुळें गरजू लोकांना तात्पुरता पैसा मिळून यामध्यें गुंतवणूक करण्यास आकर्षण वाढेल व दुसऱ्या पंचवार्षिक योजनेस जास्त पैसा मिळेल.

(२) बँकांना ट्रेझरीमधून रिझर्व्ह बँकेकडील खात्यांत जमा करण्यास रकमा पाठविण्याची मोफत सवलत आहे. तशीच सवलत त्या खात्यांतील जादा रक्कम ट्रेझरीच्या ठिकाणीं आणण्याकरितांहि मिळणें जरूर आहे. यामुळें चलन कमी असलेल्या भागांत चलनं प्रसार लवकर होईल.

(३) ५ कोटीपेक्षा कमी खेळतें भांडवल असलेल्या बँकांना व लहान कंपन्यांना कॉर्पोरेशन टॅक्समध्यें सवलत मिळाली.


(४) स्टॅटच्यूटरी रिझर्व फंडाकरितां वाढलेल्या रकमांवर इन्कम टॅक्स माफ असावा.

(५) सरकारी कर्जरोखे रिझर्व बँकेकडे ठेवल्याचें सर्टिफिकेट बँकांनीं दिल्यास कांहीं सरकारी खात्यांत तें मान्य करण्यांत येतें. तशी सवलत सेंट्रल एक्साईज डिपार्टमेंटकडे नाहीं. त्यामुळें बँकांनीं या खात्याकडे खात्रीसाठीं ठेवलेल्या कर्जरोख्यांवरील व्याज वसूल होण्यास फारच दिरंगाई होते. तरी वरील सर्टिफिकेटाची सवलत याहि खात्यांतून मिळावी.

(६) बँकांचे दावे समरीपद्धतीनें निकाल करण्यांत यावे.

### श्री. दातार ह्यांचें भाषण

उत्तरादाखल श्री. दातार यांनीं, संबंधी खात्याकडे या सूचना आपण विचारासाठीं देऊं असें सांगून बँकांनीं आपल्या शक्तीचा उपयोग गरीब व लहान जनतेसाठीं करण्याकडे कल ठेवणें आवश्यक आहे असें प्रतिपादलें. बेळगांव बँकेच्या ग्रामीण भागांतील उपकारक कार्याचा उल्लेख करून तिच्यासारख्या होत चाललेल्या प्रगतीबद्दल अभिनंदन केलें.



श्री. दातार, बँकेच्या डायरेक्टरांचे समवेत

# दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर, ओझर (तांबट) जि. नाशिक, खोपोली जि. कुलाबा

श्री. के. पां. जोशी (अध्यक्ष) | श्री. का. म. महाजन (उपाध्यक्ष)

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. | ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. | ४,००,००० |
| रिझर्व्ह फंड व इतर रिझर्व्ह | रु. | १,१४,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ६०,००,०००चे वर |

बँकेचे नवीन इमारतींत माफक भाड्यांत सेफ डिपॉझिट लॉकर्सची सोय केली आहे.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
मॅनेजिंग डायरेक्टर्स

टेलिफोन नं. २४८३ "तारेचा पत्ता CENCOBANK"

# पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि. पुणें शहर

—स्थापना १९१७—

★ लोकशाही राज्ययंत्रणा आणि देशव्यापी नियोजन यांची सांगड घालून समाजवादी अर्थरचना प्रत्यक्षांत आणण्याचा अभिनव प्रयोग आज आपण करीत आहोंत.

★ सहकार हा लोकशाही नियोजनाचा प्राण आहे.

★ लोकशाही नियोजनाचें दुसरें पाऊल—दुसरी पंचवार्षिक योजना यशस्वी होण्यासाठीं आपल्या बचतीची गरज आहे.

★ सहकारी तत्त्वावर चालणाऱ्या आमच्या बँकेंत आपली बचत गुंतवा आणि भारताच्या दुरुस्तीचे शिल्पकार व्हा.

खालील बोलके आंकडे बँकेच्या सर्वांगीण प्रगतीची कल्पना देतील.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भागांचें भांडवल | रु. | १०,००,००० |
| वसूल भागांचें भांडवल | रु. | ९,२५,९५० |
| गंगाजळी व इतर निधि | रु. | ८,६८,५१८ |
| एकूण ठेवी | रु. | १,७६,७९,३१० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | १,०७,९४,४१० |

वा. ग. अळतेकर
मॅनेजिंग डायरेक्टर.

# भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

मुख्य कचेरीः—भोर, जि. पुणें.

शाखाः—पुणें, पाली व शिरवळ.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. | ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. | ७७,००० |

## बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. | न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. दृ. खोले. | श्री. चं. रा. राठी.
श्री. गो. वा. देवी | श्री. बा. ग. धंडुके.

सरकारी रोखे खरेदी–विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षें मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते. दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरीः—बुधवार घ. नं. ३६१–६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा.

वाय. एस. जोशी
मॅनेजर.

# दि बेळगांव बँक लिमिटेड

स्थापना १९३० : शेड्यूल्ड बँक

दक्षिण महाराष्ट्र व उत्तर कर्नाटकमधील पहिली शेड्यूल्ड बँक

शाखाः—१ संकेश्वर, २ होसूर बेळगांव, ३ गोकाक, ४ जयसिंगपूर, ५ वेंगुर्ला, ६ मालवण, ७ नंदगड, ८ गडहिंग्लज, ९ रामदुर्ग, १० चिकोडी, ११ सौंदत्ती, १२ बेळगांव, १३ नरगुंद, १४ शिरोडा, १५ चिपळूण, १६ कणकवली, १७ निपाणी, १८ बैलहोंगळ, १९ मिरज, २० अथणी, २१ देवगड, २२ ठळकवाडी बेळगांव, २३ सावंतवाडी.

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ६,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड्स | रु. | २,४६,००० |
| ठेवी | रु. | १,०५,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | १,२०,०,०००० |

बेळगांव येथें बँकेच्या स्वतःच्या मालकीच्या इमारतींत अद्ययावत पद्धतीचा सेफ डिपॉझिट व्हॉल्ट ता. १०।४।१९५३ पासून सुरू आहे. ता. १।९।५४ पासून सेफ डिपॉझिट व्हॉल्टमधील लॉकर्सचे दर लोकांचे खास सोयीकरितां कमी केले आहेत. तरी सर्वांनीं व्हॉल्टला एक वेळ भेट देऊन, सवलतीचे दराचा अवश्य फायदा घ्यावा.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

एच्. एस्. कुलकर्णी, मॅनेजर.

## नियोजन मंडळाची कार्यक्रम मूल्यमापन संघटना
### समाज विकास व राष्ट्रीय विस्तार कार्यक्रमाचा आढावा
### (२)

गांवकऱ्यांत निर्माण झालेल्या उत्साहाचा पुरेपूर उपयोग करून घेण्याच्या दृष्टीनेंच गांवकऱ्यांच्यासाठीं करावयाच्या सुखसोयींच्या योजना, आर्थिक मदत देण्याच्या पद्धतीनेंच पार पाडण्यांत याव्यांत, सरकारनें द्यावयाच्या रकमेचें प्रमाण कमी केलें तरी चालेल. कारण अशा सुखसोयींच्या लाभांची गांवकऱ्यांना जाणीव झाली असून ते अधिकाधिक प्रमाणांत आपला वांटा उचलण्यास पुढें येत आहेत. समाज विकास योजनेंतील सर्व खेडीं विकास कार्यक्रमाखालीं यावींत आणि सुखसोयी सर्वांना सारख्या प्रमाणांत मिळतील याकडे लक्ष देण्यांत यावें असें अहवालांत सुचविण्यांत आलें आहे.

समाज विकास कार्यक्रमाच्या विभागांत साध्य झालेल्या गोष्टी हा भावी काळांतील सर्वांगीण विकासाचा प्रारंभ आहे. कांहीं प्रमाणांत सुखसोयींची तरतूद झाल्यामुळें प्रगतीच्या मार्गांतील कांहीं अडचणी दूर झाल्या असून जनतेंत एक प्रकारच्या विश्वासाची भावना निर्माण झाली आहे. एक प्रकारचें नवीन वातावरण तयार झालें आहे असें सांगून अहवाल पुढें म्हणतो, "विकास कार्य ही सतत चालू राहणारी एक प्रक्रिया असून समाज विकास कार्यक्रम व राष्ट्रीय-विस्तारयोजना आणि यानंतरची अवस्था हे तीन वेगवेगळे टप्पे असून एकांतून दुसरा याप्रमाणें ते सर्व संबंधित असावेत. म्हणजे या कार्यक्रमाखालीं आलेल्या विभागाची अधिक झपाट्यानें व व्यापक प्रमाणावर प्रगति होत राहील व आपल्या प्रयत्नांबद्दलचा जनतेचा विश्वास वृद्धिंगत होईल.

समाज विकास कार्यक्रमांत अंतर्भूत असलेल्या सर्वांगीण विकासाचे निदान दोन टप्पे पडतात. पहिल्या टप्प्यांत ग्रामसुधारणेच्या कार्यांवर व सुखसोयींवर भर द्यावा लागतो तर दुसऱ्या टप्प्यांत शेतीच्या सर्वांगीण सुधारणेकडे व ग्रामीण भागांतील संस्था अधिक भक्कम करण्याकडे लक्ष द्यावें लागतें. तीन वर्षें पुरीं झालेल्या समाज विकास योजनांच्या विभागांत विकासाचा पहिला टप्पा पुरा झाला असून त्यामध्यें आतां दुसऱ्या टप्प्यांतील कामें हातीं घेण्याची वेळ आलेली आहे. या कार्यक्रमांचा विस्तार होण्याआड संशोधनाची व तांत्रिक ज्ञानांतील उणीव येत असल्याकारणानें या अहवालांत संशोधनावर अधिक महत्त्व देण्यांत आलें आहे. म्हणून तांत्रिक बाबी [illegible] खात्यांस सुधारणा करण्याची सूचना अहवालांत करण्यांत आली आहे. तसेंच या खात्यांतून संशोधन विभाग सुरू करण्यांत यावेत असेंहि सुचविण्यांत आलें आहे.

### पंचायतींचें स्थान

कोणत्याहि प्रकारचें विकासकार्य सतत चालू ठेवावयाचें असेल पंचायतीसारख्या ग्रामसंघटनेकडे त्याची जबाबदारी असावी आणि म्हणून अशा संस्था निर्माण करण्याकडे आणि असतील तेथें त्या भक्कम करण्याकडे लक्ष देण्यांत यावें. कार्यक्षम पंचायती असणाऱ्या खेड्यांत विकास कार्यक्रमांची प्रगति व जनतेचें सहकार्य अधिक चांगलें आढळून येतें. तसेंच विकास कार्याकडे लक्ष देण्यामुळें पंचायतीबद्दल गांवकऱ्यांच्या मनांत आदरभावना निर्माण होते. अशा स्थानिक संस्थांना अधिक अधिकार देण्यांत यावेत व अधिक जबाबदाऱ्या त्यांचेवर टाकाव्यात असें प्रतिपादन करून अहवालांत पुढें असें म्हटलें आहे कीं, त्यांना केवळ आर्थिक मदत देऊन भागण्यासारखें नसून, पंचायती आपलें काम कार्यक्षमपणें पार पाडूं लागेपर्यंत त्यांना मार्गदर्शन व सक्रिय मदत करण्याची गरज आहे. पंचायतीचें पारंपरिक स्वरूप बदलत्या परिस्थितींत चालण्यासारखें नसल्यामुळें उद्योन्मुख समाजरचनेशीं सुसंगत असें नवें स्वरूप त्यांना दिलें पाहिजे.

### खात्याखात्यांत सुसूत्रता राहण्याची जरूरी

विकास गटाच्या पातळीवर नियंत्रणाची सध्यां असलेली दुहेरी पद्धति समाधानकारक नाहीं ही गोष्ट अहवालांत दिग्दर्शित करण्यांत आली आहे, सर्व तांत्रिक बाबतींत खात्याच्या तांत्रिक तज्ज्ञांचें मत हें अंतिम समजण्यांत यावें आणि दैनंदिन कामाशीं अधिकाधिक प्रमाणांत त्यांचा संबंध येण्याची व्यवस्था करावी. जनतेच्या जीवनावर सतत वाढत्या प्रमाणांत परिणाम करीत जाणाऱ्या सुधारणा जनतेप्रत पोंचविणें गटविकास अधिकाऱ्यांना शक्य व्हावें म्हणून कारभारयंत्रणेंत सुसूत्रता राखण्याची गरज आहे. गटविकास अधिकाऱ्यांची भरती करतांना केवळ एकाच खात्यांतील लोकांची भरती न करतां सर्व खात्यांतून लोक निवडण्यांत यावेत आणि विशेषतः नेतृत्वाचे गुण व विकास कामांची आवड असणारे तरुण निवडण्यांत यावेत. हा अधिकारी व्यापक दृष्टिकोण असणारा असावा.

### मुंबई राज्यांतील सहकारी चळवळीची गेल्या पांच वर्षांतील प्रगति

| वर्षे | लोकसंख्या | सोसायट्यांचें खेळतें भांडवल | दर माणशीं खेळतें भांडवल | सोसायट्यांची संख्या | प्राथमिक सोसायट्या | प्राथमिक सोसायट्यांचे सभासद | निव्वळ सभासद (दुबार-सभासद १०% वगळून) | लोकसंख्येशीं सभासदांचें प्रमाण. ५ जणांचें कुटुंब |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | लक्ष | लक्ष | | | | | | |
| १९५०-५१ | ३५९ | ८,२९७ | २३·१ | १६,११५ | १५,७७४ | २२·२९ | २०·०७ | ३०·९ |
| १९५१-५२ | ३५९ | ९,३७१ | २६·० | १६,९३२ | १६,५७१ | २४·२२ | २१·८० | ३३·७ |
| १९५२-५३ | ३५९ | १०,१०२ | २८·१ | १७,३०१ | १६,९३३ | २५·२९ | २२·७६ | ३५·२ |
| १९५३-५४ | ३५९ | १०,९२५ | ३०·४ | १८,०७९ | १७,७११ | २६·८७ | २४·१८ | ३७·४ |
| १९५४-५५ | ३५९ | १२,१३३ | ३३·७ | १८,८४७ | १८,४९७ | २८·४२ | २५·५८ | ३९·५ |

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व
श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ [illegible].